संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१६१/२०२५

सी.एन.आर.नं. एम.एच.पी.ए.१५०००३६६२०२५ नि.क्र. ०१

**तुळजाभवानी अर्बन मल्टी स्टेट को–ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी विरुध्द अनिल बिडवे**

## आदेश निशाणी क्र.१

फिर्याद व फिर्यादीचे सत्यापण वाचले. फिर्यादीने दाखल केलेल्या दस्तऐवजांची पडताळणी केली. फिर्यादीच्या विधीज्ञांचे म्हणणे ऐकले. प्रथमदर्शनी असे दिसते की, आरोपीने फिर्यादीला धनादेश जारी केलेला आहे. सदरहू धनादेशवरील Drawes signature differ या कारणामुळे अनादरीत झाला आहे. फिर्यादीने आरोपीला कायदेशीर नोटीस पाठवून धनादेशाच्या रक्कमेची मागणी केली आहे; परंतु आरोपीने सदरहू रक्कम विहीत कालावधी मध्ये फिर्यादीला दिलेली नाही. फिर्यादीने ही फिर्याद कायद्याप्रमाणे मुदतीत दाखल केलेली आहे. एकंदरीत, अवलोकन केले असता असे आढळून येते की, प्रथम दर्शनी धनादेश पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ प्रमाणे गुन्हा घडलेला आहे. म्हणून, माझ्या मते, धनादेश पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ नुसार आदेशीका काढण्याकरिता सदरहू खटल्यात सकृत दर्शनी सर्व बाबींची पुर्तता झाल्याचे दिसून येत आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी विरुध्द धनादेश पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ अंतर्गत आदेशीका काढण्यात येते.

०२. फिर्यादीने आरोपीविरुध्द काढण्यात येणा–या समन्सला जोडण्यासाठी फिर्यादची एक नक्कल सदरहू आदेश पारीत झाल्यापासून तीन दिवसांच्या आत न्यायालयात दाखल करावी.

GAURAV ANANTRAO TARAL Digitally signed by GAURAV ANANTRAO TARAL Date: 2025.06.13 17:09:39 +0530

दिनांकः १३.०६.२०२५

**(जि.ए.तराळ)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

सेलू, जि. परभणी.